# विवेकानंदला उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार

**कोल्हापूर :** राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या हस्ते विवेकानंद महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. शिवाजी विद्यापीठात झालेल्या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे, पन्हाळा प्रांत अधिकारी समीर शिंगटे, उपजिल्हाधिकारी समाधान शेंडगे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. जिल्हा नोडल अधिकारी म्हणून विवेकानंद कॉलेजचे रा. से. योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील यांना उत्कृष्ट संपर्क अधिकारी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी राज्यशास्त्र विभागप्रमुख समीक्षा फराकटे उपस्थित होत्या. यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे , संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले.

यांना अभिनंदन केले.

पुढारी

कोल्हापूर, बुधवार, ६ मार्च २०२४

# रोटरॅक्ट क्लब ऑफ विवेकानंद कॉलेजचा पहिला पदग्रहण सोहळा

**कोल्हापूर :** रोटरी इंटरनॅशनल अंतर्गत, रोटरॅक्ट क्लब ऑफ विवेकानंद कॉलेजचा पहिला पदग्रहण सोहळा उत्साहात झाला. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१७० गव्हर्नर नासिर बोरसदवाला, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी मार्गदर्शन केले. कोल्हापूर झोन हेड अभिजित पाटील यांनी रोटरॅक्टमधून परदेशातील शिक्षणाच्या संधी याबद्दल मार्गदर्शन केले. नूतन अध्यक्षपदी रोहित पाटील, सचिवपदी वैष्णवी राजपूत , खजानीसपदी प्रवीण जामखंडी व संचालकपदी सर्व विभागांतील विद्यार्थांची निवड करण्यात आली. यावेळी रोटेरियन दादासाहेब कोडोलकर, मानसिंग पानसकर, वारणा वडगावकर, उदय दीक्षित उपस्थित होते.

P
10/3/24

PE
6/3/24